नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक १०/०९/२०२२ (शनिवार)**

**(सकाळ)**

---

## चोरी

**१) पो.स्टे. सावनेर** :– अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील धापेवाडा मडासावंगी शिवार येथे दिनांक १५/०८/२०२२ चे १९.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– महेश सुरेश निखार, वय ४० वर्ष, रा. वार्ड क्र. २ धापेवाडा याने आपल्या शेतात पीकाला खत देण्याकरीता २३ रासायनीक खताचे पोते हे धापेवाडा शिवारातील शेतातील धुऱ्यावरील खुल्या झोपडीत ठेवले होते व शकर पाडुरंग ढोके रा. मडासावंगी यांनी आपले मडासावंगी शिवारातील शेतात पीकाला खत देण्याकरीता २५ रासायनीक खताचे पोते हे ठेक्याने करीत असल्याने शेतातील खुल्या बंगल्यात ठेवलेले असे एकुण ४८ रासायनीक खताचे पोते अंदाजे कि. ४४,७६२/–रू. चा मुद्देमाल नमुद आरोपी नामे– नाना उर्फ ज्ञानेश्वर हरीभाउ खडतकर, रा. पीपळा किनखेडे याने चोरुन नेले आहे. सदर चोरीस गेलेल्या माला पैकी एकुण १० रासायनीक खताचे पोते आरोपीचे शेतातील झोपडीत लपवुन ठेवले असल्याचे फिर्यादीचे रिपोर्टवरुन सदरचा गुन्हा नोंद करुन तपासात घेतला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार माणीक शेरे मोक्र. ९५५२५५७७६० हे करीत आहे.

**२) पो.स्टे. रामटेक** :– अंतर्गत ०८ कि. मी. अंतरावरील धोटीटोक येथे दिनांक ०६/०९/२०२२ चे १०.३० वा. ते दिनांक ०८/०९/२०२२ चे ०७.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– आकाश शिवराम वासनिक, वय ३४ वर्षे रा. घोटीटोक यांच्या मालकाचे प्लांट मधील रूमचे समोर खुल्या जागेत ठेवलेले सिमेंट खुर्ची बनविण्याचे लोखंडी साचे ४ नग जुने त्यात लोखंडी प्लेट २ नग व लोखंडी २ पाय बनविण्याचे साचे २ नग असे अंदाजे किमत १७,०००/–रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार ओमप्रकाश कोटवते पोस्टे रामटेक मो.क्र. ९५४५८४४७८८ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. कळमेश्वर** :– अंतर्गत १४ कि. मी. अंतरावरील मौजा आलेसुर ब्रिजेश शाहु यांचा वॉटर सप्लॉयर गोडावुन मध्ये येथे दिनांक ०८/०९/२०२२ चे १९.३० वा. सुमारास फिर्यादी नामे– राजेश श्यामकिशोर जायस्वाल, वय ६१ वर्ष, रा. अंलकार नगर, मानेवाडा नागपुर हे बिजेश शाहु यांचे वॉटर सप्लॉयर गोडाउन मध्ये कॉन्ट्रटर चे काम पाहतात. त्या गोडाउन मध्ये मनिष बांगडे हा काम करतात. आरोपी नामे– १. सुरज अबुडारे, २. प्रज्वल सुभाष मोहुरले दोन्ही रा. आलेसुर यांनी संगनमत करून गोडावुन मधील लोखंडी सेट्रींग टॉवर ५ नग व २ एमएस लोखंडी प्लेट किमती २०,०००/–रू. चा मुद्देमाल चोरून घेवुन जाण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ५११, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार उईके मो. नं. ९८२३३२४८२६ हे करीत आहे.

**४) पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :— अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील धापेवाडा मडासावंगी शिवार येथे दिनांक १५/०८/२०२२ चे १९.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— राजेश नरेन्द्रजी उमप वय ४५ वर्ष रा. बुटीबोरी श्रीकृष्ण ले आउट धंदा मोटर रिवाईडींग दुकान यांचे आर. सन्स नावाने मोटर रिवाईडींग चे दुकान आहे. दि. ०९/०९/२२ ला ते दिवसभर आपले दुकानाता होते सायंकाळी ७.३० वा चे सुमारास दुकानाला कुलुप लावुन घरी निघुन गेले. दि. १०/०९/२२ चे १०.०० चे सुमारास फिर्यादीचे दुकानात काम करणारा रमेश अलगरे याचा फोन आला व सांगितले की, दुकानात चोरी झाली आहे. त्यानंतर त्यांनी दुकानात जावुन पाहीले तर दुकानाचे मागचे शटर उचलुन तसेच तोडुन अज्ञात आरोपीने प्रवेश करून दुकानातील तांबा तार ७० किलो तसेच लिड वायर ३० किलो असा एकुण ४५ हजार रू. चा मुद्देमाल चोरी झाल्याचे दिसुन आले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार वेरूळकर हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**